# // प्रेसनोट //

## दि. ०४/०३/२०२२

## दि. ०५/०३/२०२२ रोजीचे लसीकरण सत्र नियोजन

कोविड-१९ महामारीच्या प्रतिबंधासाठी दि. १६ जानेवारी २०२१ पासून संपूर्ण देशात व त्याअनुषंगाने राज्यशासनाच्या आदेशान्वये मिरा भाईंदर कार्यक्षेत्रात टप्पाटप्प्याने कोविड-१९ लसीकरणास सुरुवात झाली असून जगात वाढत असलेले कोविड रुग्ण व आढळून येत असलेल्या ओमायक्रॉन व्हेरिएंटमुळे कोविड -१९ वर्किंग ग्रुप ऑफ नॅशनल टेक्निकल ॲडव्हायझरी ग्रुप ऑफ इम्युनायझेशन (NTAGI) तसेच स्टॅन्डींग टेक्निकल सायन्टीफीक कमिटी (STSC) ऑफ (NTAGI) यांनी कोविड-१९ लसीकरण वाढविण्यासाठी निर्देश दिले आहेत.

- तक्ता क्र. १ मधील अ.क्र. १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४ व १५ या लसीकरण केंद्राच्या ठिकाणी १५ वर्षावरील लाभार्थ्यांकरीता कोव्हॅक्सीन लसीच्या पहिल्या व दुसऱ्या डोसकरीताचे लसीकरण सत्र तसेच १८ वर्षावरील नागरिकांकरीता कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन लसीचा पहिला व दुसरा डोस तसेच आरोग्य कर्मचारी (HCW), अग्रभागी काम करणारे कर्मचारी (FLW), व ६० वर्षावरील सहव्याधी असलेल्या नागरिकांकरीता कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन लसीचा (Precaution Dose) बुस्टर डोसकरिताचे लसीकरण सत्र Online व Offline पद्धतीने आयोजित करण्यात येत आहे.
- तक्ता क्र. १ मध्ये लसीकरणाची वेळ व डोसेस नमुद करण्यात आले आहेत.
- लाभार्थ्यांना कोविन सिस्टिमवर स्वत :च्या मोबाईल नंबरव्दारे लसीकरणासाठी नोंदणी करता येईल . ऑनलाईन पध्दतीने लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांना दि. ०४/०३/२०२२ रोजी संध्याकाळी ७.०० नंतर कोविन पोर्टलवर नोंदणी करता येईल. तसेच ऑफलाईन पध्दतीने लसीकरणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांना लसीकरण सत्राच्या दिवशी लसीकरण केंद्राच्या ठिकाणी (Onsite) जाऊन नोंदणी करण्याची सुविधा सुध्दा उपलब्ध राहील.
- लसीकरण केंद्रांच्या ठिकाणी प्राधान्याने मिरा भाईंदर शहरातील Offline पध्दतीने लसीकरणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांकरीता टोकन वाटप दि.०५/०३/२०२२ रोजी लसीकरण सत्राच्या वेळी केले जाईल.
- महानगरपालिकेच्या कर्मचारी व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नागरिकांनी टोकन वाटप करु नये तसेच कोणत्याही नागरिकांनी टोकन वाटप प्रक्रीयेत हस्तक्षेप करु नये अथवा बोगस टोकन वाटप करु नये.
- तरी मा. श्रीम. ज्योत्सना हसनाळे, महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका व मा. श्री. दिलीप ढोले, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेमार्फत मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की , कोरोनाच्या तिसरी लाट तीव्र स्वरुपाची असू शकते, याकरीता कोरोना आजाराच्या संभाव्य तिसऱ्या लाटेची तीव्रता टाळणेकामी १५ ते १८ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांनी तसेच आरोग्य कर्मचारी (HCW), अग्रभागी काम करणरे कर्मचारी (FLW) व ६० वर्षावरील सहव्याधी (Comorbidity) असलेल्या नागरिकांनी Precaution डोस(बुस्टर डोस ) करीताचे लसीकरण त्याचबरोबर अध्यापही कोविड लसीकरणा पासून वंचित असलेल्या नागरीकांनी लवकरात लवकर आपले कोविड लसीकरण पूर्ण करुन घ्यावे.
- तसेच लसीकरण केंद्रांच्या ठिकाणी नागरिकांनी मास्क परिधान करुन तसेच सामाजिक अंतर (Social Distance) चे पालन करुन लसीकरण सुलभरित्या होणेस महानगरपालिकेस सहकार्य करावे

डॉ. अंजली पाटील
कोविड नोडल अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
वैद्यकीय विभाग
लसीकरण सत्र नियोजन - 05.03.2022
तक्ता क्र. 1

**15 वर्षावरील लाभार्थ्यांकरीता कोव्हॅक्सीन लसीच्या पहिल्या व दुसऱ्या डोसकरीताचे लसीकरण सत्र तसेच 18 वर्षावरील नागरिकांकरीता कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन लसीचा पहिला व दुसरा डोस तसेच आरोग्य कर्मचारी(HCW), अग्रभागी काम करणारे कर्मचारी(FLW), व 60 वर्षावरील सहव्याधी असलेल्या नागरिकांकरीता  कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन  लसीचा (Precaution Dose) बुस्टर डोस.  करिताचे लसीकरण सत्र नियोजन - 05/03/2022**

| अ.क्र. | कोविड लसीकरण केंद्राचे नाव | पत्ता | लसीचा प्रकार | एकूण डोसेस | लाभार्थी गट | वेळ | डोस | ऑनलाईन/ ऑफलाईन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उत्तन आरोग्य केंद्र | मोठा गांव, उत्तन | कोविशिल्ड | २०० | • १८ वर्षावरील नागरिकांकरीता कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन लसीचा पहिला व दुसरा डोस.<br>• आरोग्य कर्मचारी (HCW), अग्रभागी काम करणारे कर्मचारी(FLW), व ६० वर्षावरील सहव्याधी असलेल्या नागरिकांकरीता  कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन लसीचा (Precaution Dose) बुस्टर डोस.<br>• सन २००७ व सन २००७ च्या आधी जन्म झालेल्या शाळेतील विध्यार्थांकरीता कोव्हॅक्सीन लसीचा पहिला व दुसरा डोस. | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ४.०० | पहिला डोस व दुसरा डोस तसेच (Precaution Dose)बुस्टर डोस | ऑनलाईन व ऑफलाईन |
| २ | मोर्वा उपकेंद्र | मोर्वा उपकेंद्र, मनपा शाळा, उत्तन रोड, भाईंदर (प) | कोविशिल्ड | १०० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ५० | | | | |
| ३ | पं. भिमसेन जोशी सामान्य रुग्णालय | मॅक्सस मॉल जवळ, १५० फूट रस्ता, भाईंदर (प) | कोविशिल्ड | ५०० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| ४ | भाईंदर (प.) आरोग्य केंद्र | भाईंदर (प.),पोलिस स्टेशन जवळ,स्टेशन रोड,भाईंदर (प.) | कोविशिल्ड | ५०० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | १०० | | | | |
| ५ | विनायक नगर आरोग्य केंद्र | विनायक मंदिराजवळ, भाईंदर (प.) | कोविशिल्ड | २०० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | १०० | | | | |
| ६ | गणेश देवल आरोग्य केंद्र | गणेश देवल नगर, शिवसेना गल्ली, भाईंदर (प.) | कोविशिल्ड | ३०० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | १०० | | | | |
| ७ | स्व. मोरेश्वर पाटील भवन, प्रभाग क्र.३ | खारीगाव, तलाव रोड, वॉर्ड ऑफिस नंबर-३, भाईंदर (पूर्व) | कोविशिल्ड | ३०० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | १०० | | | | |
| ८ | नवघर क्षयरोग केंद्र, एस. एन कॉलेजच्या जवळ, नवघर रोड, भाईंदर (पुर्व) | हनुमान मंदिर, भाईंदर (पूर्व) | कोविशिल्ड | ३०० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | २०० | | | | |

| अ.क्र. | कोविड लसीकरण केंद्राचे नाव | पत्ता | लसीचा प्रकार | एकूण डोसेस | लाभार्थी गट | वेळ | डोस | ऑनलाईन/ ऑफलाईन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | आर २, गोल्डन नेस्ट | न्यु गोल्डन नेस्ट, मिरा-भाईंदर क्रिडा संकुल समोर, भाईंदर (पूर्व) | कोविशिल्ड | ३०० | • १८ वर्षावरील नागरिकांकरीता कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन लसीचा पहिला व दुसरा डोस.<br>• आरोग्य कर्मचारी (HCW), अग्रभागी काम करणारे कर्मचारी(FLW), व ६० वर्षावरील सहव्याधी असलेल्या नागरिकांकरीता कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन लसीचा (Precaution Dose) बुस्टर डोस.<br>• सन २००७ व सन २००७ च्या आधी जन्म झालेल्या शाळेतील विध्यार्थांकरीता कोव्हॅक्सीन लसीचा पहिला व दुसरा डोस. | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ४.०० | पहिला डोस व दुसरा डोस तसेच (Precaution Dose)बुस्टर डोस | ऑनलाईन व ऑफलाईन |
| | | | कोव्हॅक्सीन | १०० | | | | |
| १० | अप्पासाहेब धर्माधिकारी हॉल | सेवेन स्केवेयर शाळे जवळ, दीपक हॉस्पिटल रोड, मीरा रोड (पू) | कोविशिल्ड | ५०० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| ११ | स्व. मीनाताई ठाकरे हॉल | रामदेव पार्क, मीरा रोड (पू) | कोविशिल्ड | ५०० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| १२ | भा. इंदिरा गांधी रुग्णालय | पुनम सागर कॉम्पलेक्सच्या जवळ, मिरारोड (पुर्व) | कोविशिल्ड | ५०० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| १३ | हैदरी चौक | वोक्हार्ट हॉस्पिटलच्या पुढे, हैदरी चौक मिरारेड (पू) मीरा रोड हेल्थ पोस्ट | कोविशिल्ड | ३०० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | २०० | | | | |
| १४ | पेणकरपाडा आरोग्य केंद्र | पेणकरपाडा महानगरपालिका शाळा, पेणकरपाडा | कोविशिल्ड | ३०० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | २०० | | | | |
| १५ | काशीगाव आरोग्य केंद्र | काशीगाव महानगरपालिका शाळा, काशीगाव | कोविशिल्ड | ३०० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | २०० | | | | |

* वरिल तक्त्यात अ.क्र. १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४ व १५ या लसीकरण केंद्राच्या ठिकाणी १५ वर्षावरील लाभार्थ्यांकरीता कोव्हॅक्सीन लसीच्या पहिल्या व दुसऱ्या डोसकरीताचे लसीकरण सत्र तसेच १८ वर्षावरील नागरिकांकरीता कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन लसीचा पहिला व दुसरा डोस तसेच आरोग्य कर्मचारी(HCW), अग्रभागी काम करणारे कर्मचारी(FLW), व ६० वर्षावरील सहव्याधी असलेल्या नागरिकांकरीता कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन लसीचा (Precaution Dose) बुस्टर डोसकरिताचे लसीकरण सत्र Online व Offline पद्धतीने आयोजित करण्यात येत आहे.
* कोविड लसीकरण सत्र Online बुकींगकरीता आज दि. ०४/०३/२०२२ रोजी कोविन पोर्टल साईटवर संध्याकाळी ७.०० वाजेनंतर प्रसिध्द केले जातील.
* लसीकरण केंद्राच्या ठिकाणी Offline पध्दतीने लसीकरणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या तरुणांकरीता टोकन वाटप दि.०५/०३/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. नंतर केले जाईल.